# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९३ वी बैठक दिनांक २९ जुलै २०१६

## ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९३ वी बैठक शुक्रवार दि. २९ जुलै २०१६ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| २. | मा. श्री. डी. के. जैन | ... | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य |
| ३. | मा. श्री. सुनिल पोरवाल | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ४. | मा. श्री. आय. एस. चहल | ... | प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य |
| ५. | श्री. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्ही. एम. कुलकर्णी | ... | मुख्य अभियंता (दवप्र) व सहसचिव |
| २. | श्री. ह. आ. ढंगारे | ... | मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव |
| ३. | श्री. ता. ना. मुंडे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| ४. | श्री. खलील अन्सारी | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ५ | श्री. विरेंद्र जाधवराव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मकृखोविम, पुणे |
| ६. | श्री. म. गु. वानखेडे | ... | अधीक्षक अभियंता, मकृखोविम, पुणे |

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ९३ वी बैठक दिनांक २९ जुलै २०१६

## ठराव

ठराव क्र. ९३/१

" ठराव करण्यात येतो कि, दि. २०/०६/२०१६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९२ व्या बैठकीत पारीत करण्यात आलेल्या ठरावांपैकी ९२/३, ९२/१४, ९२/१५, व ९२/१६ या बाबत कोणतेही ठराव पारित झालेले नसल्याने हे ठराव वगळता उर्वरित ठराव कायम करण्यात आले."

ठराव क्र. ९३/२

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांशी संबधीत मा.महालेखापाल यांच्या अलग लेखा अहवालाचे अवलोकन होऊन त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत असून, महामंडळाचे सदर वार्षिक लेखे मा.महालेखापाल यांच्या अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन यासह मा. विधानमंडळासमोर सादर करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत आली व हा प्रस्ताव मा. विधानमंडळास सादर करण्याचे ठरले."

ठराव क्र. ९३/३

"ठराव करण्यात येतो की, टेमघर धरणातील गळतीच्या कारणांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत केलेल्या तज्ञ समितीने दि.३०/६/२०१६ रोजी सादर केलेला त्यांचा अहवाल व शिफारसी स्विकृत करण्यास नियामक मंडळाची खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे."

१. "गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम आपत्कालिन काम म्हणून प्राधान्याने हाती घेण्यात यावे.

२. सदर कामासाठी वाढीव (पूरक) निधी / पुर्नविनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याचा व या प्रकल्पावर सुधारित प्रशासकीय मान्यता पेक्षा जादा खर्च करण्याचा प्रस्ताव एक आठवड्यात शासनास सादर करावा.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९३ वी बैठक दिनांक २९ जुलै २०१६

३. टेमघर धरणाच्या सदोष बांधकामास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारांची नांवे काळया यादीत टाकण्याची कार्यवाही महामंडळस्तरावर करण्यात यावी. यासाठी राज्यातील व राज्याबाहेरील कंत्राटदाराची नोंदणी करणाऱ्या संस्थांना कळविण्यात यावे.

४. सदोष बांधकामास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करावी."

"मान्य"

(इंजि. रा. ब.घोटे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(गिरीष महाजन)
मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे